## नि.दि.मु.क्र. १४/२०१३ मधील नि.क्र. ८६ वरील आदेश

०१. प्रस्तुतचा दावा हक्कप्रस्थापना आणि कायमस्वरुपी मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल करण्यात आला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती आणण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे क्रम ६ नियम १७ आणि क्रम १ नियम १० व कलम १५१ अन्वये दाखल केलेला आहे. अर्जातील वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी त्यांच्या मुळ कैफियतीत दुरुस्ती केलेली असून, अर्जातील नमूद इसमांचा वादग्रस्त स.क्र. २४ हि.क्र. ३ या मिळकतीत कथित हक्कसंबंध असून, त्यांना याकामी आवश्यक ते पक्षकार म्हणून सामील केले नसल्याने दाव्यास आवश्यक ते पक्षकार सामील न केल्याच्या तत्वाची बाधा येते अशी तक्रार उपस्थित केलेली आहे. त्यामुळे तांत्रिक मुद्दा उपस्थित होवू नये या कारणास्तव अर्जातील नमूद इसमांना प्रस्तावित प्रतिवादी क्र. ६ ते ३३ म्हणून दाव्याच्याकामी समाविष्ट करण्याची वादीस परवानगी देण्यात यावी. तसेच वादपत्रातील परिच्छेद क्र. ८ च्या पुढे '८अ' म्हणून '' सदर दाव्यातील प्रतिवादी नं. ६ ते ३३ यांनी .................. कारणास्तव दाखल केलेला आहे.'' असा मजकूर समाविष्ट करण्याची वादीस परवानगी देण्यात यावी. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नसून, अर्ज नामंजूर करण्याने वादीचेच पैशाच्या स्वरुपात भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन वादीने अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी प्रस्तुत अर्जाकरीता नि.क्र. ८९ वर आपले म्हणणे दाखल केलेले आहे. अर्जातील सदर प्रतिवादींचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, अर्जातील विधाने खोटी असून केवळ प्रतिवादींनी त्यांच्या कैफियतीत आवश्यक त्या पक्षकारांसंबंधी मुद्दा उपस्थित केला म्हणून अर्जातील नमूद इसमांना पक्षकार करण्याची कोणतीही आवश्यकता नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. संहितेचे क्रम ६ नियम १७ व क्रम १ नियम १० अथवा कलम १५१ अन्वये प्रस्तुतचा अर्ज चालण्यास पात्र नाही. वादीची स्वच्छ मनाने

मागणी दिसत नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज फेटाळण्याची विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष सबळ कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे खरेखुरे वादप्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता आवश्यक आहे काय? | होय. |
| २ | प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार आहे काय? | नाही. |
| ३ | प्रस्तावित दुरुस्तीमुळे विरुध्द पक्षकारांचे काही नुकसान होणार आहे काय? | नाही. |
| ४ | अंतिम आदेश कोणता? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ३ करीता :—**

०५. सदरील मुद्दे न्यायाच्या दृष्टिकोनातून एकत्रीतपणे विवेचनासाठी घेण्यात आले आहेत. उभयपक्षकारांतर्फे संपुर्ण युक्तिवाद ऐकला.

०६. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतूदीअन्वये असे प्रमाणित करण्यात आले आहे की, न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोन्हीपैकी कोणत्याही पक्षकारास, त्यांच्या वादकथनास, न्याय्य असेल अशा रीतीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. परंतु न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर,

पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेऊनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

०७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतूदीनुसार, जर प्रस्तावित सुधारणेमुळे विरुध्द बाजूस अन्याय होणार नसेल व दाव्यातील खरे प्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता प्रस्तावित सुधारणा अभिलेखावर असणे आवश्यक असेल तर अशा दुरुस्तीस परवानगी देणे गरजेचे असते. केवळ उशिर झाला म्हणून दावा दुरुस्तीचा अर्ज न्यायालयास फेटाळता येणार नाही. तसेच नवे वादकारण समाविष्ट करणेकरीता सदर तरतूदीनुसार वादीस प्रस्तावित दुरुस्ती करण्याची मंजूरी देता येणार नाही.

०८. नि. क्र. ८६ वरील प्रस्तावित दुरुस्तीतील मजकूर पाहता, प्रस्तावित दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच नि.क्र. ५४ वरील प्रतिवादी क्र. १ ते ३ यांच्या कैफियतीतील परि.क्र. ११ मधील नमूद मजकूर पाहता, प्रस्तुत अर्जातील नमूद इसमांना प्रतिवादी म्हणून दाव्याच्याकामी सामील करुन घेणे न्यायोचित होणार असून, त्या अनुषंगाने वादी दाव्यात करु ईच्छित असलेली परि.क्र. ८अ मधील प्रस्तावित दुरुस्ती पाहता, अर्ज मंजूर करण्याने प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही ही बाब स्पष्ट होते. शिवाय अभिलेख व रोजनाम्यावरुन दाव्याच्याकामी वादीने अद्याप सरतपासाचे शपथपत्र सादर केलेले नाही. तथापि, अर्ज दाखल करण्यास वादीने जो विलंब केलेला आहे, तो पाहता त्याच्यावर रक्कम रु. ३००/— इतका खर्च आकारुन आणि खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ते ३ यांना देवू करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता वरील संपूर्ण विवेचनावरुन मुद्दा क्र. १ यांचा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदविण्यात येवून, मुद्दा क्र. २ व ३ यांचे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहेत. करीता मुददा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज रक्कम रु. ३००/— (रक्कम रुपये तीनशे) फक्त इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. वादीने दाव्याच्या सरनाम्यात प्रतिवादी क्र. ६ ते ३३ म्हणून अर्जातील नमूद इसमांना सामील करुन घेवून प्रस्तावित दुरुस्ती प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत वादपत्रात करुन घ्यावी.

३. वादीने दुरुस्त दाव्याच्या प्रती प्रतिवादी क्र. ६ ते ३३ यांना समन्सची बजावणी होणेकामी दाखल कराव्यात.

४. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ ते ३ यांना १४ दिवसांच्या कालावधीत देण्यात यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :— २८ जून, २०१७ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.